कोल्हापुर व सांगली जिल्हयातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्याबाबत-शुदीपत्रक

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
आपत्ती व्यवस्थापन प्रभाग (मदत व पुनर्वसन)
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः -आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/आव्यप्र-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १२ जून, २०२४

संदर्भ:- महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक-आव्यप्र-२०२४/प्र.क्र.३०/आव्यप्र-१ दिनांक १३ मार्च, २०२४

प्रस्तावना

कृष्णा भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने "महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम" (MRDP) राबविण्याबाबत मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार संदर्भाधीन दिनांक १३.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. मा. मंत्रीमंडळ बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुषंगाने संदर्भाधिन दिनांक १३.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अधिक माहिती समाविष्ट करून शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्याची बाब विचाराधिन होती.

शासन शुध्दीपत्रक

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयात "प्रकल्पासाठी अर्थसहाय्य" या शिर्षकाखालील पहिला परिच्छेदातील प्रथम तीन ओळी मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आला आहे:-

"हा प्रकल्प, एकूण ४०० US $ मिलियनचा आहे. (रु.३२०० कोटी) त्यापैकी या प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून २८० US $ (रु.२२४० कोटी) मिलियनचे अर्थसहाय्य मागितले आहे. उर्वरित ३० टक्के निधी म्हणजे १२० US $ मिलियन (रु.९६० कोटी) राज्य शासनाच्या निधीतून खर्च करण्यात येईल."

<u>ऐवजी</u>

"हा प्रकल्प, एकूण रु.३२००.०० (४०० मिलियन US $) चा आहे. सदर रकमेच्या ७०% म्हणेजच रु.२२४०.०० कोटी (२८० मिलियन US $) इतके अर्थसहाय्यक जागतिक बँकेकडून घेण्यात येणार आहे. प्रकल्प खर्चाच्या उर्वरित ३०% निधी म्हणेजच रु.९६०.०० कोटी (१२० मिलियन US $) इतका खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल."

<u>असे वाचावे.</u>

०२. संदर्भाधीन शासन निर्णयातील उपरोक्त परिच्छेदातील सुधारणेसह परि. क्र. ६ नंतर खालील परिच्छेद क्रमांक ७ व ८ असे दोन परिच्छेद समाविष्ट करण्यात येत असून सदर परिच्छेद क्रमांक ७ व ८ खालीलप्रमाणे वाचण्यात याव्येत:-

६. या प्रकल्पाचा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) म्हणून महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र ही संस्था काम पाहील. तसेच प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) म्हणून जलसंपदा विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (MKVDC) आणि मदत व पुनर्वसन विभागाच्या नियंत्रणाखालील आपत्ती व्यवस्थापन कक्ष हे काम पाहतील.

७. जागतिक बँकेकडून प्राप्त होणारा निधी तसेच राज्याच्या स्वनिधीतून खर्च करावयाच्या बाबींसाठी आवश्यकतेनुसार महालेखापाल यांच्या मान्यतेने स्वतंत्र लेखाशीर्ष घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०२४०६१२१६५९५१२०१९ असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HITENDRA YADAORAO DUFARE

Digitally signed by HITENDRA YADAORAO DUFARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=1170c73752038d1c4f8b3a8c1729f3f55bd8bd13206eed4aead71a63b3f1dcee,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=02BBA6FFE202C222698F7E91A562A124096291549EBA836EE89EC11CB9F688D5,
cn=HITENDRA YADAORAO DUFARE
Date: 2024.06.12 17:12:43 +05'30'

(हितेंद्र दुफारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय विभाग सर्व
९. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती/आव्यप्र-१